| | | |
|---|---|---|
| | **प्रसिद्धिपत्रक**<br>पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ, पुणे-४११००६<br>फोन नं. ०२०-२६६८५००० | |

जा.क्र./पोउआ/वाह/ 8042 /२०२४ पुणे दिनांक – 9/11/२०२४

दि. १२/११/२०२४ रोजी मा.व्हि.व्हि.आय.पी. यांचा पुणे दौरा असल्याने, पुणे शहरातील सर्व वाहतूक विभागांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/ टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, सर्व वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**मा. व्हि.व्हि.आय.पी. यांचा दि. १२/११/२०२४ रोजी पुणे दौरा आहे. दौऱ्यामध्ये मा. व्हि.व्हि.आय.पी. पुणे भेटीवर येणार आहेत त्या अनुषंगाने खालील नमुद रस्त्यांवर दि. १२/११/२०२४ रोजी आवश्यकतेनुसार वाहतुकीमध्ये बदल करण्यात येत आहेत.**

१) **केळकर रोड -**
**टिळक चौक ते भिडे पुल जक्शंन एकेरी मार्ग करण्यात येत आहे.**

- पर्यायी मार्ग – झेड ब्रिज वरील वाहनांनी डावीकडे वळण घेवुन भिडे पुल जक्शंन वरुन उजवीकडे वळण घेवुन इच्छित स्थळी जावे.

२) **गरुड गणपती चौक ते भिडे पुल जक्शंन (केळकर रोड) प्रवेश बंद राहील.**
**गरुड गणपती चौक ते झेड ब्रिज जक्शंन प्रवेश बंद राहील**

- पर्यायी मार्ग – गरुड गणपती चौकामधुन डावीकडे वळण घेवुन टिळक चौका मधुन यु टर्न घेवुन । केळकर रोड मार्गे इच्छित स्थळी जावे.

३) **डेक्कन बाजुने भिडे पुल मार्गे येणाऱ्या वाहनांना सरळ केळकर रोडकडे प्रवेश बंद राहील**

- पर्यायी मार्ग – भिडे पुला नंतर डावीकडे वळण घेवुन नदीपात्रामधील रोड वरुन इच्छित स्थळी जावे.

पोलीस उप-आयुक्त, वाहतूक, पुणे शहर.

(अमोल झेंडे )
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

प्रति,

१) **जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी**, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- १)**सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – ३**, पुणे शहर.

२) **पोलीस निरिक्षक, प्रेसरूम**, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.